*शांताबाईंनी फोन उचलला होता. फोनवर सुमितचा रूममेट निखिल होता. पहिली दोन मिनिटं तर तो गप्पच होता. शेवटी कसंबसं अडखळत त्यानं ती बातमी सांगितली होती. सुमित...काल रात्री...लायब्ररीतून परत येताना...हल्ला...सुरा भोसकून...त्याचं प्रेत...शांताबाईंनी एकदम फोन बंदच केला होता आणि त्या मटकन खाली बसल्या होत्या. अशोकरावांना काही समजलंच नव्हतं. पण लगेचच पुन्हा  निखिलचा फोन आला होता. यावेळी तो अशोकरावांनी उचलला होता. निखिलनं सांगितलेली बातमी ऐकून ते सुन्न झाले होते!*

परदेशात शिकणाऱ्या मुलाचा खून झाल्याची बातमी अशोकरावांना कळते. त्यांचं जग उध्वस्त होऊन जातं. त्यांना काळजी असते ती त्यांच्या बायकोची. तिला बसलेल्या शॉकमधून ती कशी बाहेर येणार? वाचा ‘भेट’ या कथेत.